# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/ग्रापनि/२०१०/प्र.क्र. ३१/का.८
नविन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ३०/०९/२०१०

प्रति,
जिल्हाधिकारी, सर्व

विषय :- ग्रामपंचायत निवडणुकीत चिन्ह वाटपाबाबतचे सुधारीत आदेश.

संदर्भ :- १) आयोगाकडील क्र. रानिआ/ग्रापनि/२००७/प्र.क्र.२०/का.८,
दि.२१/८/२००७
२) आयोगाकडील क्र. रानिआ/ग्रापनि/२००७/प्र.क्र.८/का.८,
दि.१३/११/२००७

महोदय,

ग्रामपंचायत निवडणुकांमधील चिन्ह वाटपासंबंधीचे वरील दोन्ही संदर्भाधिन आदेशामध्ये सुधारणा करुन रानिआ/ग्र ापनि/२०१०/प्र.क्र३१/का.८, दि. २९/९/२०१० निर्गमित करण्यात आले आहे. सदर आदेश तात्काळ लागू झाले आहेत. तरी या पुढील सर्व ग्र ामपंचायत निवडणुकांमध्ये सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी. आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

आपला
सही/-
( मंगेश व. मोहिते )
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सत्यमेव जयते

**ग्रामपंचायत निवडणुकीत चिन्ह वाटपासंबंधी सुधारीत आदेश.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
क्रमांक-रानिआ/ग्रापनि/२०१०/प्र.क्र.३१/का.-८,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २९/०९/२०१०

## आदेश

ज्याअर्थी; मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ मधील नियम १६ च्या तरतुदीनुसार लढवावयाच्या प्रत्येक निवडणुकीच्याबाबतीत राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या चिन्हांपैकी कोणतेही एक चिन्ह निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवारास नेमून देईल अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के च्या तरतुदीनुसार व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०-अ अन्वये पंचायतीच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले आहे. आणि ज्याअर्थी; मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-अ पोटकलम ४ अन्वये अधिनियम व नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आयोगाला न्याय्य व मुक्त वातावरणात निवडणुका घेण्याच्यादृष्टीने या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश काढता येतील अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाला मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०-अ अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाने दि.२१/०८/२००७ व दि.१३/११/२००७ च्या आदेशान्वये ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये निवडणूक चिन्ह वाटप करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित केली आहे.

आणि ज्याअर्थी; जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींची निवडणूक लढविणा-या उमेदवारांना चिन्हांचा प्राधान्यक्रम देण्याचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर ग्रामपंचायतीची निवडणूक लढविणा-या उमेदवारांना चिन्हांचा प्राधान्यक्रम देण्याचा पर्याय देणे व निवडणूक

चिन्ह वाटपाची प्रक्रिया अधिक सुलभ व कार्यक्षम करण्याच्यादृष्टीने उक्त आदेशांमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आयोगाचे मत झाले आहे.

त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये निवडणूक चिन्हे वाटप करण्याची सुधारीत कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करीत आहे :-

१) कोणत्याही एका प्रभागात कोणतेही निवडणूक चिन्ह एकापेक्षा अधिक उमेदवारांना वाटप करण्यात येणार नाही. प्रत्येक प्रभागाचे चिन्ह वाटप स्वतंत्ररित्या केले जाईल. त्यामुळे एका प्रभागात वाटप केलेली चिन्हे दुस-या प्रभागात देखील वाटप केली जाऊ शकतात.

२) राज्य निवडणूक आयोगाकडील अधिकृत व अद्ययावत चिन्हांच्या तक्त्यातील मुक्त चिन्हांपैकीच चिन्हे उमेदवारांना नेमून देण्यात येतील.

३) उमेदवाराने **नामनिर्देशनपत्रासोबत किंवा नामनिर्देशनपत्र सादर करण्याच्या शेवटच्या वेळेपर्यंत** सोबत जोडलेल्या **विहित नमुना-"अ"** मध्ये **चिन्हांच्या प्राथम्यक्रमाचा तक्ता** निवडणूक निर्णय अधिकारी यांना देणे आवश्यक राहील. एखाद्या उमेदवाराने एकाच पदाकरीता एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर केली असली तरीही **चिन्हांच्या प्राथम्यक्रमाचा तक्ता एकदाच भरुन देणे आवश्यक राहील.** उमेदवारास जास्तीत जास्त पाच चिन्हांचा प्राथम्यक्रम देता येईल.

४) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राथम्यक्रमाचा तक्ता **नमुना-"अ"** प्राप्त झाल्यानंतर त्यावर प्राप्त झाल्याची तारीख व वेळ नमूद करावी व स्वाक्षरी करावी. तसेच सोबत जोडलेल्या नोंदवही **नमुना "ब"** मध्ये नोंद घ्यावी.

५) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नामनिर्देशन सुरु होण्याच्या पहिल्या दिवसापासून प्रत्येक दिवशी नामनिर्देशनाची वेळ संपल्यानंतर विहित केलेल्या **नमुना-"ब "** नोंदवहीची प्रत त्यांच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावी. एखाद्या उमेदवाराने जर चिन्हाबाबत विहित **नमुना-"अ"** मध्ये प्राथम्यक्रम दिला नसेल तर त्यांच्या नावासमोर निरंक असे नमूद करण्यात यावे.

६) निवडणूक निर्णय अधिकारी छाननीनंतर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी त्यांच्या चिन्हांच्या प्राथम्यक्रमासह सोबतच्या **नमुना-"क " मध्ये चिन्ह वाटपाकरीता** तयार करील.

७) नमुना-क मध्ये तयार केलेल्या चिन्ह वाटपाच्या यादीतून निवडणुकीतून माघार घेणाऱ्या उमेदवारांची नावे वगळून माघार घेण्याची मुदत संपल्यानंतर सोबतच्या **नमुना-"ड "** मध्ये चिन्ह वाटपाची नोंदवही तयार करेल.

८) त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी **नमुना-"ड"** च्या नोंदवहीच्या आधारे चिन्ह वाटपाची कार्यवाही आयोगाने निश्चित केलेल्या दिनांक व वेळेनंतर प्रभागनिहाय खालीलप्रमाणे करेल :-

अ) चिन्ह वाटप करताना प्रथम सादर केलेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशनपत्रांच्या क्रमानुसार वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीतील (निवडणूक निर्णय अधिकारी यांचेसाठी सूचना पुस्तिका (भाग-२) मधील जोडपत्र-४) उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे वगळून ऊर्वरित उमेदवारांचा चिन्ह वाटपाकरिता **वैध नामनिर्देशनपत्राच्या अनुक्रमानुसार** क्रम लावला जाईल आणि ही यादी सोबत जोडलेल्या **नमुना-"ड"** च्या नोंदवहीमध्ये दर्शविली जाईल.

ब) एका प्रभागात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी **नमुना-"ड"** नोंदवहीतील **वैध नामनिर्देशनपत्राच्या अनुक्रमानुसार पहिल्या उमेदवारास** त्याच्या **प्राथम्यक्रमानुसार** मागणी केलेल्या आणि उपलब्ध असलेल्या चिन्हाचे त्या उमेदवारास वाटप करण्यात येईल. यानुसार पहिल्या उमेदवारास चिन्ह वाटप करुन झाल्यानंतर त्यापुढील उमेदवारास चिन्ह वाटप करण्यात येईल. त्या उमेदवाराचे, प्रथम प्राधम्यक्रमाचे चिन्ह वरील कार्यवाहीनुसार अगोदर वाटप झाले असल्यास त्यांच्या प्राथम्यक्रम तक्त्यातील दुसऱ्या क्रमांकाच्या चिन्हाचे त्याला वाटप करण्यात येईल. आणि ते चिन्ह देखील अगोदरच वाटप झाले असल्यास त्याच्या तिसऱ्या प्राथम्यक्रमाच्या क्रमांकाच्या चिन्हाचे वाटप करण्यात येईल. अशाप्रकारे प्राथम्यक्रम तक्त्यातील पाचव्या क्रमांकाच्या चिन्हापर्यंत वाटप करण्यात येईल. त्याचवेळी असे प्रत्येक चिन्ह वाटप केल्यानंतर चिन्हांच्या तक्त्यामध्ये त्या संबंधित चिन्हावर वाटप केल्याची खूण करण्यात येईल. असे करताना कोणतेही चिन्ह त्याच प्रभागात एकापेक्षा अधिक उमेदवारांना दिले जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

क) वरीलप्रमाणे वाटप करताना एखाद्या उमेदवाराने दिलेल्या प्राथम्यक्रमाच्या पाचही चिन्हांचे त्यापूर्वीच वाटप झाले असल्यास अशा उमेदवारास, त्याचप्रमाणे ज्या उमेदवाराने कोणताही प्राथम्यक्रम विहित मुदतीत दिलेला नाही अशा सर्व उमेदवारांना **वैध नामनिर्देशनपत्राच्या अनुक्रमानुसार** आयोगाच्या मुक्त चिन्हांच्या अद्ययावत तक्त्यातील वाटपानंतर शिल्लक असलेल्या मुक्त चिन्हांचे अनुक्रमानुसार वाटप करण्यात येईल.

९) पहिल्या प्रभागाचे चिन्ह वाटप पूर्ण झाल्यानंतर त्याच कार्यपध्दतीनुसार उर्वरित प्रभागंचे चिन्ह वाटपाचे काम क्रमाक्रमाने करण्यात येईल.

सदर आदेश हे तात्काळ लागू होतील.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

सही/-

(मंगेश व. मोहिते)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

C:\Documents and Settings\admin\Desktop\symboll order.doc/ps

# नमुना - अ
## चिन्हांच्या प्राथम्यक्रमाचा नमुना

निवडणूक लढवित असलेल्या ग्रामपंचायतीचे नाव ------

प्रभाग क्रमांक------ आरक्षणाची वर्गवारी ------

चिन्हांच्या मागणीचा प्राथम्यक्रम

१)
२)
३)
४)
५)

/-

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

(उमेदवाराचे नाव)

---

सादर केल्याचा दिनांक व वेळ :-

/-

स्वाक्षरी

निवडणूक निर्णय अधिकारी------------ ग्रामपंचायत

---

# नमुना - ब
## नामनिर्देशनपत्र नोंदवहीचा नमुना

ग्रामपंचायतीचे नाव---------------------- प्रभाग क्र. ---------

| अ. क्र. | नामनिर्देशनपत्र सादर केल्याचा दिनांक व वेळ | उमेदवाराचे नाव | वर्गवारीचे नाव | प्राथम्यक्रमाचा तक्ता सादर केल्याचा दिनांक व वेळ | प्राथम्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ |
| २ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ |

६२५

# नमुना - क
## चिन्ह वाटपाकरीता उमेदवारांची यादी

ग्रामपंचायतीचे नाव----------------------

प्रभाग क्र. ---------

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | वर्गवारीचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर केल्याचा दिनांक व वेळ | प्राथम्यक्रमाचा तक्ता सादर केल्याचा दिनांक व वेळ | प्राथम्यक्रम |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ |
| २ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ |

## नमुना - ड

# निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या चिन्ह वाटपाची नोंदवही

ग्रामपंचायतीचे नाव---------------------- प्रभाग क्र. ---------

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | वर्गवारीचे नाव | वैध नामनिर्देशनपत्र सादर केल्याचा दिनांक व वेळ | प्राथम्यक्रमाचा तक्ता सादर केल्याचा दिनांक व वेळ | मागणी केलेल्या चिन्हांची नावे | वाटप केलेले चिन्ह |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ | |
| २ | | | | | १<br>२<br>३<br>४<br>५ | |

स्वाक्षरी

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिका-याचे नांव